S.N.D.T. Women's University
1, Nathibai Thackersey Road,
New Marine Lines, Churchgate,
MUMBAI - 400 020.
Phone : + 91 22 2203 1879
Fax : + 91 22 2201 6226

A- Grade (CGPA 3.08)

श्रीमती ना. दा. ठाकरसी महिला विद्यापीठ
१, नाथीबाई ठाकरसी मार्ग, न्यु मरिन लाईन,
चर्चगेट, मुंबई - ४०० ०२०.
Telegram : UNIWOMEN
Website : sndt.ac.in

ॲक.जन/परिपत्रक/ २०२१-२२/ ५२३ दिनांक २३ ऑगस्ट २०२१

## परिपत्रक :-

विषय:- कोव्हिड-१९ या महामारीच्या पार्श्वभूमीवर विविध शुल्कांमध्ये विद्यार्थ्यांना सवलत देण्यासंदर्भात

संदर्भ :- १. बैठक-२०२१/प्र.क्र.१३७/विशि-३ दिनांक ३० जून २०२१ चे उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालयचे पत्र

२. व्यवस्थापन परिषद बैठक दिनांक २९ जुलै २०२१, ठराव क्रमाक FAC M5

कोव्हिड-१९ या महामारीच्या पार्श्वभूमीवर मानविय दृष्टिकोनातून विद्यापीठांच्या विविध शुल्कांमध्ये सवलत देण्याच्या अनुषगांने उच्च व तंत्रशिक्षण विभागाने ३० जून २०२१ रोजी शासननिर्णय काढून विद्यापीठांना कोव्हिड १९ च्या काळात आर्थिक नुकसानीची कारणे देत शुल्कात सुट देण्याबाबत विनंती केली होती.

'शुल्कमाफीची बाब' व्यवस्थापन परिषदेमध्ये सादर केली असता व्यवस्थापन परिषदेने सदर बाबीवर विचार करुन शासनांकडून प्राप्त दिशानिर्देशानुसारच इतर शुल्कात खालीलप्रमाणे सत्र २०२०-२१ करिता सुट देण्याचा निर्णय घेतला आहे.

सदर परिपत्रक निर्गमीत करण्यात येत असून कृपया संबंधीतांनी खालीलप्रमाणे आवश्यक कार्यवाही करावी.

१. ज्या विद्यार्थी/विद्यार्थीनींचे आई/वडील/पालक कोव्हिड-१९ च्या प्रादुर्भावामुळे मयत झाले असतील अश्या विद्यार्थ्यांचे/विद्यार्थीनींचे पदवी/पदव्युतर शिक्षण पूर्ण होईपर्यंतचे संपूर्ण फी माफ करण्यात यावे.
२. अनुदानित महाविद्यालये व विद्यापीठ विभागातील सर्व अभ्यासक्रमांसाठी आकारण्यात येणा-या इतर शुल्कांमधील जिमखाना शुल्क, विविध गुणदर्शन/उपक्रम शुल्क, कॉलेज मॅगझीन शुल्क, संगणक शुल्क, क्रिडा निधी, वैद्यकीय मदत निधी आणि युथ फेस्टीवल अशा ज्या बाबीवर कोणत्याही प्रकारे खर्च करण्यात आलेला नाही त्या बाबींसाठी आकारण्यात येणारे शुल्क पूर्णपणे माफ करण्यात यावे.
३. प्रयोगशाळा व ग्रंथालय यांची देखभाल व ग्रंथालयामध्ये ई-कन्टेंट विकत घेण्यासाठी खर्च करण्यात आला असल्याने याबाबतच्या शुल्कामध्ये ५० टक्के सवलत देण्यात यावी.
४. विद्यार्थ्यांद्वारे वसतिगृहाचा उपयोग करण्यात येत नसल्याने वसतिगृह शुल्कापोटी आकारण्यात येणारे शुल्क पूर्णपणे माफ करण्यात यावे.

Scanned with CamScanner

S.N.D.T. Women's University
1, Nathibai Thackersey Road,
New Marine Lines, Churchgate,
MUMBAI - 400 020.
Phone : + 91 22 2203 1879
Fax : + 91 22 2201 6226

A- Grade (CGPA 3.08)

श्रीमती ना. दा. ठाकरसी महिला विद्यापीठ
१, नाथीबाई ठाकरसी मार्ग, न्यु मरिन लाईन,
चर्चगेट, मुंबई - ४०० ०२०.
Telegram : UNIWOMEN
Website : sndt.ac.in

५. विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित महाविद्यालयांत देखील इतर शुल्कांमधील **जिमखाना शुल्क, विविध गुणदर्शन/उपक्रम शुल्क, कॉलेज मॅगझीन शुल्क, संगणक शुल्क, क्रिडा निधी, वैद्यकीय मदत निधी आणि युथ फेस्टीवल** अशा ज्या बाबीवर कोणत्याही प्रकारे खर्च करण्यात आलेला नाही त्या बाबींसाठी आकारण्यात येणारे शुल्क माफ करण्यात यावे. त्याचप्रमाणे **प्रयोगशाळा व ग्रंथालय शुल्क** यामध्ये ५० टक्के सवलत देण्यात यावी.

६. सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षात ज्या वर्षाच्या परीक्षा झालेल्या नाहीत त्या वर्षांचे परीक्षा शुल्क पुढील शैक्षणिक वर्षात समायोजित करण्यात यावे.

७. विद्यार्थ्यांकडे प्रलंबित असलेले शुल्क ३ ते ४ हप्त्यात भरण्याची सवलत देण्यात यावी, तसेच शुल्क थकीत असेल तर परीक्षेचा अर्ज करण्यात अडवू नये.विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी.

उपरोक्तच्या अनुषगांने केलेल्या कार्यवाहीचा अहवाल विद्यापीठास सादर करावा.

(डॉ.रुबी ओझा) 23/8/21
अधिष्ठाता, वाणिज्य आणि व्यवस्थापन
शैक्षणिक विभाग अतिरिक्त भार

प्रति,
सर्व विद्यापीठ विभागप्रमुख,
विद्यापीठ संलग्नित आणि संचलित महाविद्यालयीन प्राचार्य,
अनुदानित / विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित प्राचार्य,

प्रत माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीस्तव अग्रेषित :-

१. मा.कुलसचिव, एस.एन,डी.टी.महिला विद्यापीठ
२. मा. संचालक, परिक्षा व मुल्यमापन मंडळ
३. उपवित्त व लेखा अधिकारी, एस. एन. डी. टी. महिला विद्यापीठ
४. विद्यापीठ संचलित आणि संलग्नित महाविद्यालये
५. सर्व विभागप्रमुख, एस. एन. डी. टी. महिला विद्यापीठ
६. मा. कुलगुरूंचे स्वीय सहाय्यक
७. मा. कुलसचिवांचे स्वीय सहाय्यक
८. डॉ. संजय शितोळे, विद्यापीठ संकेत स्थळावर प्रकाशित करण्यास्तव सादर

Scanned with CamScanner